दिनांक १३/०२/२०२१

**प्रसिध्दी पत्रक**

**आरोपी लोकसेवक प्रसाद दुर्गादास कुलकर्णी, वय ३२ वर्ष, पद-कनिष्ठ सहायक, मुद्रणालय विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांनी १०००/- रु लाच स्विकारल्याने ते लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या जाळ्यात.**

| | |
|---|---|
| आरोपी लोकसेवकाचे नाव, हुद्दा , पत्ता | प्रसाद दुर्गादास कुलकर्णी, वय ३२ वर्ष, पद-कनिष्ठ सहायक, मुद्रणालय विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.<br>पत्ता- रा. एन-११, टीव्ही सेंटर, औरंगाबाद. |
| गुन्हा दाखल पोलीस ठाणे, दिनांक | पोलीस ठाणे मुकुंदवाडी, औरंगाबाद शहर येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे. |
| तपास अधिकारी | श्रीमती रेशमा सौदागर, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद |
| लाच रक्कम | १०००/- रु |
| लाच मागण्याचा हेतु | तक्रारदार हे वार्षिक दैनंदिनी चे पुरवठादार असुन, तक्रारदार यांचे वार्षीक दैनंदिनी २०२१ चे २,००,०००/- रु चे बील लेखा विभाग येथे जमा करून दिल्याचे बक्षीस म्हणून |
| लाच स्विकृती ठिकाण | भवानी पेट्रोल पंपाच्या बाजुला, जालना रोड, औरंगाबाद |

**तक्रारीचे थोडक्यात स्वरुप :-** यातील तक्रारदार हे वार्षिक दैनंदिनी चे पुरवठादार असुन, तक्रारदार यांचे वार्षीक दैनंदिनी २०२१ चे २,००,०००/- रु चे बील लेखा विभाग येथे जमा करून दिल्याचे बक्षीस म्हणून प्रसाद कुलकर्णी, नेमणुक- मुद्रणालय विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद हे लाचेची मागणी करित असलेबाबत तक्रारदार यांनी तक्रार दिली.

सदर तक्रारीचे अनुषंगाने लाचेच्या मागणीची शहानिशा केली असता, प्रसाद कुलकर्णी, ने-मुद्रणालय विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांनी तक्रारदार यांच्याकडे १०००/- रु लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले.

त्यावरून लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद तर्फे आज रोजी सापळा आयोजीत केला असता, आरोपी लोकसेवक प्रसाद दुर्गादास कुलकर्णी, वय ३२ वर्ष, पद-कनिष्ठ सहायक, मुद्रणालय विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांनी वरील ठिकाणी तक्रारदार यांच्याकडून १०००/- रुपये लाचेची रक्कम स्विकारल्यानंतर त्यांना ताब्यात घेण्यात आले आहे. त्याचे विरुद्ध पोलीस ठाणे मुकुंदवाडी, औरंगाबाद शहर येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

सदर कारवाई, पोलीस अधिक्षक मा. डॉ. राहुल खाडे, अपर पोलीस अधीक्षक मा. डॉ. अनिता जमादार, पोलीस उपअधीक्षक श्री. बी. व्ही. गावडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्रीमती रेशमा सौदागर यांनी केली आहे. त्यांना पोलीस अंमलदार रवींद्र अंबेकर, बाळासाहेब राठोड, कपील गाढेकर, चालक अंमलदार चांगदेव बागुल यांनी मदत केली आहे.

**तक्रारदार यांच्याप्रमाणे नागरिकांनी भ्रष्टाचारासंबंधी तक्रार देण्यासाठी पुढे यावे, असे आवाहन मा. पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद, यांनी केले आहे.**

**फोन क्रं. ०२४०-२३४४०५०, टोल फ्रि क्रं. १०६४**

**Mail ID :- १)sp१acbaurangabad@gmail.com. २) dyspacbabad@gmail.com.**

पोलीस उप अधीक्षक कार्यालय अँटी करप्शन ब्युरो, औरंगाबाद
सत्यमेव जयते

(बी.व्ही.गावडे)
पोलीस उप अधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग
औरंगाबाद.